बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बँक

**Corporate Communications & Investor Relations**
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE:-020 25614495, 25614366, 25514501 to 12 Extn.

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे पुण्यात दोन दिवसांचे गृह, वाहन, शैक्षणिक कर्ज व एसएचजी प्रदर्शनाचे आयोजन

**पुणे, दिनांक 8 नोव्हेंबर २०२३** : देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महराष्ट्रतर्फे पुणे येथे दिनांक 4 व 5 नोव्हेंबर 2023 रोजी गृह, वाहन, शैक्षणिक कर्जे तसेच बचत गट विषयक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

पुणे शहरातील तसेच पुण्याच्या बाहेरील अनेक नामवंत बांधकाम व्यावसायिक, वाहनांचे विक्रेते, शिक्षण संस्था व बचत गट या प्रदर्शनात एकत्र आले होते. ह्या प्रदर्शनात १०० पेक्षा जास्त दालनांपैकी अनेक नामवंत बांधकाम व्यावसायिक, वाहनांचे विक्रेते, व शिक्षणसंस्था यांनी व बचत गट यांची ८० पेक्षा अधिक दालनांमध्ये आपल्या उत्पादने व योजनांची माहिती प्रदाशित केली होती.

बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांच्यासह बँकेचे कार्यकारी संचालकद्वय श्री आशिष पांडे व श्री रोहित ऋषी यांनी या प्रदर्शनाचे उद्घाटन केले. तसेच या उद्घाटन समारंभास जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणाच्या प्रकल्प संचालक श्रीमती शालिनी कडू पाटील, राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेच्या मुख्य सरव्यवस्थापक श्रीमती रश्मी दरड , पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त श्री राजू नंदकर, मॉडर्न शिक्षण संस्थेचे पदाधिकारी श्री सचिन सानप व श्री अशोक चांडक, नौरोसजी वाडिया महाविद्यालयाचे प्राचार्य वसंत चाबुकस्वार , नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती वृषाली रणधीर व बँकेचे अन्य अधिकारी देखील उपस्थित होते.

सदर उद्घाटनाच्या कार्यक्रमात बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी बहूमोल मार्गदर्शन केले. " या प्रदर्शनाच्या माध्यमातून सशक्तीकरण, अन्वेषण व उत्कृष्टता यांचे पालन करण्याप्रती असलेली कटीबद्धता आम्ही या प्रदर्शनाच्या माध्यमातून अधोरेखित करीत आहोत. अनेक नामवंत बांधकाम व्यावसायिक, वाहनांचे विक्रेते, शिक्षण संस्था व बचत गट यांना या प्रदर्शनात एकत्र आणून आम्ही सेवा देत असलेल्या समुदायांची स्वप्ने साकार करून त्यांची आयुष्ये अधिक सुखकर व समृद्ध करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न आहे" असे बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी सांगितले.

श्री आशिष पांडे, बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले, "नागरिकांच्या सातत्याने बदलत जाणाऱ्या बँकिंग विषयक गरजा पूर्ण करण्यासाठी असलेली आमची तयारी यांचे प्रतिक म्हणजे हे प्रदर्शन आहे. एक सकारात्मक बदल घडवून, समृद्धी प्रत्येक घटकाच्या पर्यंत पोहोचविण्यासाठी एकत्र काम करण्याची गरज आहे. असे कार्यक्रम म्हणजे व्यवसायापेक्षा अधिक काही आहे. झपाट्याने बदलणाऱ्या आजच्या काळात डिजिटल बँकिंग आणि अन्य नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाने जगात अमुलाग्र परिवर्तन घडवून आणले आहे. आपल्या ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देण्यासाठी हे बदल स्वीकारण्यास आणि नाविन्यपूर्ण डिजिटल तंत्रज्ञान स्वीकारण्यास बँक ऑफ महाराष्ट्र नेहमीच कटिबद्ध आहे."

श्री रोहित ऋषी, बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले," आमचे ग्राहक व समुदायाने मोठ्या संख्येने एकत्र येऊन व प्रदर्शनात सहभागी होऊन अभूतपूर्व प्रतिसाद व पाठबळ दिल्यामुळे भारावून गेलो असल्याचे सांगून हे प्रदर्शन म्हणजे केवळ वित्तीय सेवा नसून सर्वांच्या उज्वल व समृद्ध भविष्याचे पाहिलेले स्वप्न आहे आणि इथे उपस्थित सर्व लोकांची स्वप्ने व आकांक्षा पूर्ण करण्यासाठी बँक कटिबद्ध आहे."

बांधकाम व्यावसायिकांनी गृहोद्योगातील अत्याधुनिक सुखसोयी प्रदर्शनात सादर करून उपस्थितांना गृह खरेदीचे अनेक पर्याय उपलब्ध करून दिले. आपल्या स्वप्नातील चारचाकी वाहन खरेदी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांना स्वयंचलित वाहन उद्योगातील अत्याधुनिक नाविन्यपूर्ण सुविधा व सुखसोयी असलेली विविध किमतीची वाहने पाहण्यास मिळाली. शैक्षणिक संस्थांनी उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक संधी व कौशल्य विकसन अभ्यासक्रमांची माहिती प्रदर्शित केली होती. स्वमदत बचत गटांना देखील त्यांची उत्पादने व सेवा प्रदर्शित करण्याची संधी सदर प्रदर्शनाच्या माध्यमातून मिळाली. स्वमदत बचत गटांनी सादर केलेल्या विविध मराठी खाद्यपदार्थ व पेयांचा आनंद प्रदर्शनाला भेट देणाऱ्या लोकांनी घेतला. यामुळे प्रदर्शन मंडपाला एखाद्या उत्सवाचे स्वरूप प्राप्त होऊन ग्राहक आणि अन्य पुरवठा घटकांना एक वेगळा आनंद यातून मिळाला. बँक या सगळ्याच्या केंद्रस्थानी होती, हे वेगळे सांगणे न लगे.

"आधार ऑन व्हील्स" च्या माध्यमातून आधार कार्डसाठी स्वतःची नोंदणी करण्याची संधी प्रदर्शनाला भेट देणाऱ्या नागरिकांना प्राप्त करून देण्यात आली. महाराष्ट्र एग्झीक्यूटर & ट्रस्टी कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी इच्छापत्र तयार करण्याचे महत्व नागरिकांना विशद करून सांगितले व कंपनी त्याबाबत कशा प्रकारे साहाय्य करू शकते हे देखील सांगितले. याच प्रदर्शनात डिजिटल दालनाचा व मेटावर्सचा अनुभव दर्शकांना घेता आला. तसेच ग्राहकांना रोख रक्कम कुठेही काढण्याची सुविधा देणारे फिरते एटीएम देखील ठेवण्यात आले होते. ग्रामीण महिला व बाल विकास मंडळ, ग्रामीण विकास केंद्र व महाराष्ट्र कृषी संशोधन व विकास निधी यांनी देखील बँकेने ग्रामीण जीवन उन्नत करण्यासाठी सुरु केलेल्या विविध उपक्रमांची माहिती देणारे सादरीकरण केले.

सदर गृह, वाहन, शैक्षणिक कर्ज व बचत गटांच्या प्रदर्शनाला ग्राहकांनी भरघोस प्रतिसाद दिला व तिथे अनेक अनुषंगिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनाला भेट देणाऱ्या ग्राहकांना गृह व वाहन खरेदीसाठी व्यापक प्रमाणावर पर्याय उपलब्ध झालेच पण विद्यार्थ्यांना देखील त्यांची करियर घडविण्यासाठी उपयुक्त अशा शैक्षणिक अभ्यासक्रमांची माहिती मिळाली.

सर्व संबंधित हितसंबंधीयांच्या समृद्धीसाठी अधिकाधिक सहयोग करण्यासाठी प्रदर्शन हे व्यासपीठ असल्याचा दृष्टीकोन बँक ऑफ महाराष्ट्राने ठेवला आहे. असे व्यासपीठ म्हणून या प्रदेशाच्या आर्थिक विकासाचे उत्प्रेरक म्हणून कार्यरत राहण्याचा बँकेचा सातत्याने प्रयत्न राहिला आहे. या प्रदर्शनामुळे बँकेची सशक्तीकरण, अन्वेषण व उत्कृष्टते प्रती असलेली कटिबद्धता प्रतिबिंबित झालीच, पण समुदायाला आर्थिक विकासाच्या व वाढीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अशा व्यासपीठाचा उपयोग करण्याचा बँकेचा प्रयत्न राहील.

*********************************